Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. २९ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १११ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION




Selected

## श्री. एफ. एम. ललवाणी विद्यालयाचा असद शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

बेटावद : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७ वी) २०२६ च्या निकालात बेटावद येथील श्री. एफ. एम. ललवाणी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी असद रईस मन्यार याने उल्लेखनीय यश संपादन करत शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरण्याचा मान मिळवला आहे. असदने या परीक्षेत ३०० पैकी १९६ गुण (६५.३३ टक्के) मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली. त्याने प्रथम भाषा व गणित या विषयांमध्ये १०६ गुण, तर तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणी या विभागात ९० गुण मिळवले. असदच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पालक, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### मंत्री आणि अधिकाऱ्यांची तब्बल दोन तास 'शाळा'; विकासकामांच्या विलंबावर घेतला जाब

# प्रलंबित कामांवर एकनाथ शिंदेंचा दणका!

### खातेनिहाय कामांचा सखोल आढावा; रखडलेल्या प्रकल्पांची कारणे, निधीची उपलब्धता आणि अंमलबजावणीबाबत कडक निर्देश

**जन सम्राट टाईम्स**

**राज्यातील विकासकामांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा कठोर भूमिका घेत मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची तब्बल दोन तास सखोल आढावा बैठक घेतली.**

विविध विभागांच्या कामांचा तपशीलवार आढावा घेताना त्यांनी प्रलंबित प्रकल्पांबाबत संबंधित मंत्र्यांसह अधिकाऱ्यांना थेट प्रश्न विचारत जाब मागितला. कोणती कामे पूर्ण झाली, कोणती रखडली, विलंबाची कारणे काय आणि निधीची कोणती अडचण आहे, याचा सविस्तर आढावा बैठकीत घेण्यात आला.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीला विविध खात्यांचे मंत्री तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक विभागाने गेल्या काही महिन्यांतील कामांचा अहवाल सादर केला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केवळ आकडेवारीवर समाधान न मानता प्रत्यक्ष अंमलबजावणीची माहिती घेत अनेक प्रकल्पांबाबत सखोल चर्चा केली.



सूत्रांच्या माहितीनुसार, बैठकीदरम्यान शिंदे यांनी प्रत्येक खात्याला उद्देशून, "कामे प्रलंबित का आहेत? अडचण नेमकी कुठे आहे? निधीची कमतरता आहे का की प्रशासकीय विलंबामुळे प्रकल्प रखडले आहेत?" असे थेट प्रश्न विचारले. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विकासकामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, यावर त्यांनी विशेष भर दिला.

गेल्या काही दिवसांत विविध मतदारसंघांतून विकासकामे रखडल्याच्या तक्रारी सरकारकडे पोहोचल्या होत्या. अनेक लोकप्रतिनिधींनीही प्रकल्पांच्या विलंबाबाबत नाराजी व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवरच शिंदे यांनी ही विशेष बैठक बोलावून प्रत्येक विभागाचा लेखाजोखा तपासल्याचे सांगितले जात आहे.

बैठकीत अंतिम टप्प्यात असलेल्या विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देशही देण्यात आले. रस्ते, पूल, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रशासकीय मदत उपलब्ध करून दिली जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. विकासकामे रखडण्यामागे निधीचा प्रश्न येऊ देणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी संबंधित विभागांना दिली. मात्र, निधी उपलब्ध असूनही कामात दिरंगाई होत असेल तर त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारी स्वीकारावी, असे स्पष्ट संकेत त्यांनी दिल्याचे समजते.

#### प्रकल्पांच्या दर्जात कोणतीही तडजोड नाही...

राज्य सरकारच्या 'विकसित महाराष्ट्र' संकल्पनेनुसार सर्व विभागांनी निश्चित कालमर्यादेत उद्दिष्टे पूर्ण करावीत, अशी अपेक्षा व्यक्त करत शिंदे यांनी प्रकल्पांच्या दर्जात कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही सांगितले. नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार सुविधा मिळणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. राज्यातील विकासकामांना गती देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा संदेश या बैठकीतून देण्यात आला. प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आता प्रत्येक विभागाला अधिक वेगाने काम करावे लागणार असून, त्यासाठी नियमित आढावा बैठका घेतल्या जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळेल का, विकासकामे वेळेत पूर्ण होतील का आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीत अपेक्षित बदल दिसून येतील का, याकडे आता राज्यभरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## अमळनेर पोलिसांची पहाटे धडक कारवाई

### अवैध वाळू वाहतूक करणारे ६ ट्रॅक्टर

**जन सम्राट टाईम्स**

**अमळनेर | प्रतिनिधी:** अमळनेर पोलिसांनी अवैध गौणखनिज (वाळू) चोरी आणि वाहतुकीविरोधात मंगळवारी पहाटे मोठी कारवाई करत बोरी नदीपात्रातून वाळूची अवैधरित्या वाहतूक करणारे सहा ट्रॅक्टर-ट्रॉली जप्त केले. या कारवाईत सहा चालकांना ताब्यात घेण्यात आले असून संबंधित ट्रॅक्टरच्या मूळ मालकांचा शोध सुरू आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत ढिवरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विनायकराव कोते यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मंगळवारी (दि. २८ जुलै) पहाटे १ ते ५ वाजेदरम्यान बोरी नदीपात्रात छापा टाकला. कारवाईदरम्यान हिंगोणे गावाजवळील नदीपात्रातून पाच विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर-ट्रॉली आणि MH-19 CJ-0775 क्रमांकाचा एक ट्रॅक्टर-ट्रॉली अशा एकूण सहा वाहनांमधून विनापरवाना वाळूची वाहतूक सुरू असल्याचे आढळून



आले. पोलिसांनी सर्व वाहने ताब्यात घेऊन अमळनेर पोलीस ठाण्यात जमा केली. या कारवाईत योगेश नामदेव भोई (रा. रुबजीनगर, अमळनेर), प्रविण सुधाकर सोनवणे (रा. हिंगोणे खुर्द), राहुल छोटू ठाकरे (रा. रुबजीनगर), अर्जुन अशोक मालचे (रा. हिंगोणे खुर्द), सतीश मोहन बावीस्कर (रा. हिंगोणे खुर्द) आणि सोमनाथ मधुकर मोरे (रा. रुबजीनगर) या सहा चालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांकडून चालकांविरुद्ध तसेच संबंधित वाहनांबाबत कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असून ट्रॅक्टरच्या मूळ मालकांचा शोध घेतला जात आहे. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी सांगितले की, अमळनेर तालुक्यात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध सातत्याने कठोर कारवाई सुरू राहणार असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही.

---

## कथित आर्थिक गैरव्यवहार व पीएम आवास घरकुल प्रकरणाची S.I.T. चौकशीची

### पीएम आवास योजनेतील १५,०२४ घरकुलांच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांना स्थगिती देण्याचीही मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**कुंभारी | प्रतिनिधी :** कुंभारी परिसरातील गोदुताई महिला विडी घरकुल गृहनिर्माण संस्थेमध्ये कथितरित्या सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार, बेकायदेशीर आर्थिक वसुली, नागरिकांवरील कथित दडपशाही, बनावट लेखापरीक्षण आणि संगनमताने झालेल्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय विशेष तपास पथक (S.I.T.) मार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात या प्रकरणातील दोषी आढळणाऱ्या सर्व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची मालमत्ता जप्त करण्यात यावी, तसेच संस्थेचा कारभार पारदर्शकपणे चालावा यासाठी गोदुताई महिला विडी घरकुल गृहनिर्माण संस्थेवर तात्काळ प्रशासक नियुक्त करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत रे नगर हौसिंग



फेडरेशन येथे उभारण्यात आलेल्या १५,०२४ घरकुलांच्या बांधकामामध्ये कथित गंभीर अनियमितता, निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणाचीदेखील S.I.T. मार्फत स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील बांधकामाला तात्काळ स्थगिती देण्यात यावी. तसेच चौकशीत दोषी आढळल्यास संबंधित संस्थेचे चेअरमन, सचिव व इतर पदाधिकारी तसेच संबंधित विकासक पंधे कन्स्ट्रक्शन यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. सदर मागण्यांवर राज्य शासनाने तातडीने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी व संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात या प्रकरणातील दोषी आढळणाऱ्या सर्व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची मालमत्ता जप्त करण्यात यावी, तसेच संस्थेचा कारभार पारदर्शकपणे चालावा यासाठी गोदुताई महिला विडी घरकुल गृहनिर्माण संस्थेवर तात्काळ प्रशासक नियुक्त करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

---

## गुरुपौर्णिमेनिमित्त 'देवाची दाढ' विशेष दर्शन व यात्रा महोत्सवाला प्रारंभ

**जन सम्राट टाईम्स**

**भडगाव | प्रतिनिधी :** भडगाव तालुक्यातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र कनाशी येथे गुरुपौर्णिमेनिमित्त 'देवाची दाढ' विशेष दर्शन व यात्रा महोत्सवाचे आयोजन मंगळवार व बुधवार, २८ आणि २९ जुलै २०२६ रोजी करण्यात आले आहे. या यात्रेसाठी राज्यासह देशाच्या विविध भागांतून हजारो भाविक उपस्थित राहणार असून मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. श्री कन्हैयालाल बाबा मंदिराचे व्यवस्थापकीय पुजारी आणि ग्रामस्थांच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही यात्रेला मोठी गर्दी अपेक्षित असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जळगाव, भडगाव आणि चाळीसगाव पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तालुका वैद्यकीय अधिकारी, कजगाव प्राथमिक आरोग्य केंद्र, कनाशी उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच बोदर्डे, कोठली, निंभोरा, गोंडगाव, कनाशी, देव्हारी, लोण आणि बोरणार येथील आशा सेविका सेवेसाठी तैनात राहणार आहेत. यात्रेत मिठाई, खेळणी, झुले, पालखी तसेच संसारोपयोगी वस्तूंची अनेक दुकाने उभारण्यात आली आहेत.

---

## बोरगाव खुर्दच्या सरपंचांना दोन वर्षांपासून त्रास; ग्रामस्थांचे धरणगाव तहसीलदारांना निवेदन!

**जन सम्राट टाईम्स**



**धरणगाव| प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील बोरगाव खुर्द येथील लोकनियुक्त सरपंच अर्चना दिनकर पाटील यांना गेल्या दोन वर्षांपासून एका व्यक्तीकडून वारंवार त्रास दिला जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी धरणगाव पोलीस ठाणे, तहसीलदार तसेच गटविकास अधिकारी (बीडीओ) यांना निवेदन देऊन योग्य कारवाईची मागणी केली आहे. निवेदनानुसार, संबंधित व्यक्ती रविंद्र जयराम पाटील हा ग्रामपंचायत कार्यालयात येऊन सरपंचांकडे ग्रामपंचायतीसंदर्भातील माहितीची मागणी करत होता. त्यावेळी तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सरपंचांनी नंतर माहिती देण्याची विनंती केल्यानंतरही त्याने वाद घातल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच, पावसामुळे ग्रामपंचायत कार्यालयाच्या पायऱ्यांवरून घसरून संबंधित व्यक्तीला दुखापत झाली. मात्र, सरपंचांचे पती, वडील आणि काका यांनी मारहाण केल्याची तक्रार त्याने धरणगाव पोलीस ठाण्यात दाखल केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

सरपंचांच्या बाजूनेही संबंधित व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, गावात प्रत्यक्षात घडले नसल्याचा दावा असलेला एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून गावाची आणि सरपंचांची बदनामी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करत २७ जुलै रोजी बोरगाव खुर्द येथील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि सरपंच यांनी धरणगाव पोलीस ठाणे, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांना निवेदन सादर केले.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## कासारखेडा येथील वीज वाहिनी जोडणीचे काम अखेर सुरू

### रखडलेले काम प्रशासनाने घेतले हाती; ग्रामस्थांकडून 'दैनिक जनसम्राट टाइम्स'चे आभार

**जन सम्राट टाईम्स**

**कासारखेडा । प्रतिनिधी:** गेल्या चार महिन्यांपासून नवीन ट्रान्सफॉर्मर बसवूनही मुख्य वीज वाहिनी (मेन सप्लाय लाईन) न जोडल्याने अंधाराचा सामना करणाऱ्या कासारखेडा ग्रामस्थांच्या समस्येला *'दैनिक जनसम्राट टाइम्स'*ने वाचा फोडल्यानंतर महावितरण प्रशासनाने तातडीने दखल घेत रखडलेले काम सुरू केले आहे. गावात नवीन ट्रान्सफॉर्मर आणि वीज खांब उभारण्यात आले होते. मात्र मुख्य वीज वाहिनीची जोडणी न झाल्याने जुन्या ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त भार पडत होता. परिणामी, वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांना मोठ्या



गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

या समस्येबाबत *'दैनिक जनसम्राट टाइम्स'*चे यावल प्रतिनिधी हर्षल पाटील यांनी सविस्तर वृत्त प्रसिद्ध करून महावितरणच्या कारभाराकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते. वृत्त प्रसिद्ध होताच महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रकरणाची दखल घेत संबंधित कंत्राटदाराला तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, आज सकाळपासून महावितरणचे कर्मचारी कासारखेडा येथे दाखल होऊन मुख्य वीज वाहिनी जोडण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर नवीन ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित होऊन गावातील वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कामाला सुरुवात झाल्यानंतर ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत 'दैनिक जनसम्राट टाइम्स' आणि प्रतिनिधी हर्षल पाटील यांचे आभार मानले. "चार महिन्यांच्या पाठपुराव्यानंतरही जे काम झाले नाही, ते बातमी प्रसिद्ध होताच सुरू झाले. जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून दिल्याबद्दल आम्ही दैनिक जनसम्राट टाइम्सचे ऋणी आहोत," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांच्या मूलभूत समस्यांना वाचा फोडून प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची भूमिका माध्यमांनी पुन्हा एकदा प्रभावीपणे पार पाडल्याचे या घटनेतून दिसून आले आहे.

#### तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश

गेल्या चार महिन्यांपासून नवीन ट्रान्सफॉर्मर बसवूनही मुख्य वीज वाहिनी (मेन सप्लाय लाईन) न जोडल्याने अंधाराचा सामना करणाऱ्या कासारखेडा ग्रामस्थांच्या समस्येला *'दैनिक जनसम्राट टाइम्स'*ने वाचा फोडल्यानंतर महावितरण प्रशासनाने तातडीने दखल घेत रखडलेले काम सुरू केले आहे. गावात नवीन ट्रान्सफॉर्मर आणि वीज खांब उभारण्यात आले होते. मात्र मुख्य वीज वाहिनीची जोडणी न झाल्याने जुन्या ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त भार पडत होता. परिणामी, वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या समस्येबाबत दैनिक जनसम्राट टाइम्स'चे यावल प्रतिनिधी हर्षल पाटील यांनी सविस्तर वृत्त प्रसिद्ध करून महावितरणच्या कारभाराकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते. वृत्त प्रसिद्ध होताच महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रकरणाची दखल घेत संबंधित कंत्राटदाराला तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

---

## 'पवित्र' पोर्टल शिक्षक भरती २०२६ मध्ये फसवणूक झाल्याचा आरोप

**जन सम्राट टाईम्स**

**जळगांव | प्रतिनिधी :** 'पवित्र' पोर्टल शिक्षक भरती २०२६ प्रक्रियेत शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TAIT) उत्तीर्ण उमेदवारांची फसवणूक होत असल्याचा आरोप कृती समिती, महाराष्ट्र राज्यने केला आहे. नवीन संचमान्यता सुधारणांच्या पार्श्वभूमीवर शिक्षक भरतीतील जागांबाबत निर्माण झालेल्या संभ्रमामुळे उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी असून, पारदर्शक भरती प्रक्रिया राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. कृती समितीचे राज्याध्यक्ष एस. एम. नागपुरे यांनी पत्रकारांशी बोलताना, आगामी शिक्षक भरतीच्या पहिल्या टप्प्यात ११ वी व १२ वीच्या वर्गांसाठी एकही जागा उपलब्ध होणार नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाल्याचा दावा केला. जर उच्च माध्यमिक स्तरावरील जागा भरण्यात येणार नसतील, तर शासनाने TAIT परीक्षा घेऊन उमेदवारांकडून परीक्षा शुल्क का घेतले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नवीन संचमान्यता नियमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच यामुळे डी.एड., बी.एड. आणि TAIT पात्र उमेदवारांचे भवितव्य धोक्यात आल्याची भावना व्यक्त केली. एस. एम. नागपुरे म्हणाले, "नवीन सुधारणांच्या नावाखाली उमेदवारांची दिशाभूल केली जात आहे. भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली गेली पाहिजे. राज्य सरकारने या प्रश्नावर तातडीने भूमिका स्पष्ट करावी. अन्यथा कृती समिती राज्यभर तीव्र आंदोलन छेडेल." कृती समितीने शासनाकडे पवित्र पोर्टलवरील सर्व रिक्त जागांची माहिती जाहीर करून भरती प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. तसेच येत्या दोन महिन्यांत भरती प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण करावा, अन्यथा राज्यभर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# पारोळ्यात शासकीय आदिवासी वसतिगृह सुरू करण्याची मागणी; आ. ॲड. अमोल पाटील यांचे आदिवासी विकासमंत्र्यांना निवेदन

## आदिवासी विकास विभागाचे उपविभागीय कार्यालय कार्यान्वित करण्याचाही आग्रह

जन सम्राट टाईम्स

**पारोळा |** पारोळा-एरंडोल विधानसभा मतदारसंघातील अनुसूचित जमातीच्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना शासकीय सेवा व शैक्षणिक सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी आमदार ॲड. अमोल पाटील यांनी आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांची भेट घेऊन महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. पारोळा येथे शासकीय आदिवासी विद्यार्थी वसतिगृह सुरू करण्यास मंजुरी देण्यात यावी, तसेच एरंडोल येथे मंजूर झालेल्या आदिवासी विकास विभागाच्या उपविभागीय कार्यालयाचा शासन निर्णय (जीआर) तातडीने निर्गमित करून कार्यालय प्रत्यक्ष सुरू करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली.



पारोळा व एरंडोल तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या नागरिकांना विविध शासकीय योजना, जात प्रमाणपत्रे, दाखले आणि आदिवासी विकास विभागाशी संबंधित कामांसाठी यावल येथे जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा अपव्यय होत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ही अडचण लक्षात घेऊन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि माजी आमदार चिमणराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार अमोल पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

या प्रयत्नांमुळे आदिवासी विकास विभागाने एरंडोल येथे उपविभागीय कार्यालय सुरू करण्यास मान्यता दिली आहे. मात्र, अद्याप अधिकृत शासन निर्णय निर्गमित न झाल्याने कार्यालय कार्यान्वित होऊ शकलेले नाही. त्यामुळे शासनाने तातडीने जीआर जारी करून कार्यालय सुरू करावे, अशी मागणी आमदारांनी मंत्र्यांकडे केली. यावेळी पारोळा येथे शासकीय आदिवासी विद्यार्थी वसतिगृह मंजूर करण्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला. मतदारसंघातील अनेक आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी इतर शहरांमध्ये जावे लागते. आर्थिक अडचणी आणि निवास व्यवस्थेअभावी अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहते. पारोळ्यात शासकीय वसतिगृह सुरू झाल्यास विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार निवासाची सुविधा मिळेल आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला मोठी चालना मिळेल, असे आमदारांनी निवेदनात नमूद केले. या दोन्ही मागण्यांवर आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित निवेदनाची दखल घेतली असून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती आमदार अमोल पाटील यांनी दिली.

### समाजाच्या विकासासाठी पाठपुरावा सुरू

एरंडोल येथे उपविभागीय कार्यालय सुरू झाल्यास मतदारसंघातील अनुसूचित जमातीच्या नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ स्थानिक स्तरावरच मिळणार असून त्यांची यावलपर्यंतची धावपळ थांबेल. त्याचबरोबर पारोळा येथे शासकीय आदिवासी वसतिगृह सुरू झाल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संधी वाढून त्यांचे उच्च शिक्षण अधिक सुलभ होणार आहे. मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिक आणि आदिवासी समाजाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचा निर्धार आमदार ॲड. अमोल पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

# ग्लास्गो कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारताची सुवर्ण कामगिरी!



जन सम्राट टाईम्स

**ग्लास्गो (चीन) |:** ग्लास्गो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारताच्या पॅरा ॲथलेटिक्स संघाने शानदार कामगिरी करत देशाला दुहेरी आनंद दिला आहे. महिलांच्या शॉटपुट F57 प्रकारात शर्मिला धनखड हिने सुवर्णपदक पटकावत इतिहास रचला, तर शिलपा शायला हिने नाट्यमय घडामोडीनंतर कांस्यपदक आपल्या नावावर केले. शर्मिला धनखड हिने अंतिम फेरीत ९.८१ मीटरचा सर्वोत्तम थ्रो करत सुवर्णपदक जिंकले. या कामगिरीमुळे भारताच्या पॅरा ॲथलेटिक्समधील दीर्घकाळाच्या प्रतीक्षेला पूर्णविराम मिळाला. तिच्या दमदार प्रदर्शनामुळे भारताच्या पदकतालिकेत आणखी एका सुवर्णपदकाची भर पडली. याच स्पर्धेत भारताची शिलपा शायला हिने ७.२६ मीटरचा वैयक्तिक सर्वोत्तम (Personal Best) थ्रो नोंदवला. सुरुवातीला ती चौथ्या स्थानावर होती, तर नायजेरियाच्या खेळाडूला कांस्यपदक जाहीर करण्यात आले होते. मात्र भारतीय पथकाने निकालाबाबत अधिकृत आक्षेप नोंदवल्यानंतर झालेल्या पुनरावलोकनात नायजेरियन खेळाडूचा थ्रो फाऊल ठरविण्यात आला. या निर्णयानंतर शिलपा शायला हिचे चौथे स्थान कांस्यपदकात रूपांतरित झाले. पदक निश्चित झाल्यानंतर शिलपा भावूक झाली आणि तिने शर्मिला धनखडसह भारताच्या या ऐतिहासिक यशाचा आनंद साजरा केला. भारतीय पॅरा ॲथलेटिक्ससाठी हा दिवस ऐतिहासिक ठरला असून, या दुहेरी पदकामुळे आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये भारताची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# पीडित महिलेच्या तक्रारीची तात्काळ दखल

## पोलीसांच्याभूमिकेचेश्रमजीवीसंघटनेकडूनकौतुक

जन सम्राट टाईम्स

**ठाणे | प्रतिनिधी :** संकटात सापडलेल्या कातकरी समाजातील एका महिलेच्या मदतीसाठी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी केलेल्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे पीडितेला न्याय मिळवून देण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. त्यांच्या संवेदनशील आणि तत्पर भूमिकेबद्दल श्रमजीवी संघटनेच्या अध्यक्षा सीता घाटाळ यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

मुरबाड तालुक्यातील कातकरी समाजातील ममता वाघ यांनी गुगलवरून श्रमजीवी संघटनेचा संपर्क क्रमांक मिळवून संघटनेशी संपर्क साधला. त्यांनी आपल्या बहिणी लक्ष्मी कोकणे हिच्यावर तिच्या पतीकडून सातत्याने शारीरिक अत्याचार होत असल्याची माहिती दिली. गंभीर मारहाणीमुळे तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून ती बोलण्याच्या स्थितीत नसल्याचे त्यांनी सांगितले. ही माहिती मिळताच श्रमजीवी संघटनेच्या अध्यक्षा सीता घाटाळ यांनी तातडीने संघटनेचे मुरबाड तालुका सचिव दिलीप शीद यांना मदत व समन्वयासाठी सूचना दिल्या. तसेच ममता वाघ यांना जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार ममता वाघ या कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गेल्या. मात्र, तेथे त्यांची तक्रार नोंदवून घेण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर सीता घाटाळ यांनी दूरध्वनीद्वारे संबंधित




अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यातूनही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे संघटनेने म्हटले आहे. यानंतर ही बाब ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यांनी तात्काळ दखल घेत कल्याण विभागाचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांना आवश्यक सूचना दिल्या. त्यानंतर कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील पगारे यांनी ममता वाघ यांचा जबाब नोंदवून घेतला आणि जुन्नर पोलीस ठाण्याशी समन्वय साधून पुढील कार्यवाही सुरू केली. दरम्यान, पीडित महिला लक्ष्मी कोकणे यांनी पोलिसांसमोर पतीकडून सातत्याने छळ होत असल्याचे सांगितले असून, अधिकृत जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे.या प्रकरणात पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दाखविलेली संवेदनशीलता, तत्परता आणि कर्तव्यनिष्ठा ही नागरिकाभिमुख पोलीस प्रशासनाचे उदाहरण असल्याचे श्रमजीवी संघटनेने म्हटले आहे. तसेच पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, पोलीस निरीक्षक सुनील पगारे आणि सहकार्य करणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही संघटनेच्या वतीने आभार मानण्यात आले.

# गौतम बुद्धांच्या पहिल्या धर्मोपदेशाची भूमी'सारनाथ 'जागतिकवारसास्थळघोषित

## युनेस्कोच्यावारसासमितीच्याअधिवेशनातऐतिहासिकनिर्णय

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी:** गौतम बुद्धांनी आपल्या जीवनातील पहिला धर्मोपदेश दिलेल्या ऐतिहासिक सारनाथ या बौद्ध स्थळाचा युनेस्कोच्या (UNESCO) जागतिक वारसा स्थळांच्या (World Heritage Sites) यादीत समावेश करण्यात आला आहे. दक्षिण कोरियातील बुसान येथे सुरू असलेल्या युनेस्कोच्या ४८व्या जागतिक वारसा समितीच्या अधिवेशनात हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे भारताच्या समृद्ध बौद्ध आणि सांस्कृतिक वारशाला जागतिक स्तरावर मोठी मान्यता मिळाली आहे. वाराणसीपासून सुमारे १० किलोमीटर अंतरावर असलेले सारनाथ हे जगभरातील बौद्ध अनुयायांसाठी अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र मानले जाते. बोधगया येथे ज्ञानप्राप्तीनंतर भगवान गौतम बुद्धांनी याच ठिकाणी आपल्या पाच शिष्यांना 'धम्मचक्कप्पवत्तन सुत्त' या नावाने ओळखला जाणारा पहिला धर्मोपदेश दिला होता. या





उपदेशातून त्यांनी चार आर्यसत्ये आणि अष्टांगिक मार्ग यांचा संदेश देत दुःखातून मुक्ती आणि निर्वाणाचा मार्ग जगासमोर मांडला. याच घटनेपासून बौद्ध धर्माच्या प्रसाराची औपचारिक सुरुवात झाल्याचे मानले जाते. सारनाथचे ऐतिहासिक महत्त्व अधिक अधोरेखित करणारी बाब म्हणजे सम्राट अशोकाने इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात येथे स्तंभ, स्तूप आणि विहारांची उभारणी केली. सारनाथ येथील अशोक स्तंभाचे सिंहशीर्ष हे आज भारताचे राष्ट्रीय चिन्ह आहे, तर भारतीय राष्ट्रध्वजावरील २४ आऱ्यांचे अशोकचक्र हे येथील धर्मचक्रावर आधारित आहे. सारनाथमधील धम्मेक स्तूप, चौखंडी स्तूप, सारनाथ पुरातत्त्व संग्रहालय आणि इतर प्राचीन बौद्ध अवशेष भारताच्या समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जिवंत प्रतीक मानले जातात. गेल्या अडीच हजार वर्षांहून अधिक काळापासून हे स्थळ करुणा, प्रज्ञा आणि शांततेचा संदेश देत जगभरातील भाविकांना प्रेरणा देत आहे. यापूर्वी वाराणसीला युनेस्कोकडून 'सिटी ऑफ म्युझिक' हा दर्जा मिळाला होता. आता सारनाथचाही जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याने वाराणसीच्या जागतिक सांस्कृतिक महत्त्वात आणखी भर पडली आहे. या निर्णयामुळे बौद्ध पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच वारसा संवर्धन, संशोधन आणि पर्यटन सुविधांच्या विकासालाही गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रेल्वेच्याकामामुळेसोनवदपाटचारीचेनुकसान

## दुरुस्तीच्या मागणीसाठी कापडणे येथील शेतकरी आक्रमक

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** मनमाड–इंदोर रेल्वे मार्गाच्या सुरू असलेल्या कामामुळे सोनवद पाटचारीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप करत कापडणे येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तात्काळ दुरुस्तीची मागणी केली आहे. पाटचारीची दुरुस्ती करून कापडणे परिसरातील सिंचनाचा प्रश्न त्वरित मार्गी लावावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून मनमाड–इंदोर रेल्वे मार्गाचे काम सुरू असून या कामादरम्यान कापडणेसह परिसरातील गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या सोनवद पाटचारीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे कापडणेसह पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात सिंचन विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



देत पाटचारीची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली. लवकरात लवकर दुरुस्तीचे काम हाती घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अन्यथा व्यापक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला. या आंदोलनात शरद पाटील, नवल पाटील, भगवान पाटील, योगेश पाटील, संजय जैन, भूषण बामणे, गणेश सैंदाणे, मनोहर माळी, काशिनाथ भिल, सतीश पाटील, दीपक पाटील, धीरज पाटील यांच्यासह कापडणे गावातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून मनमाड–इंदोर रेल्वे मार्गाचे काम सुरू असून या कामादरम्यान कापडणेसह परिसरातील गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या सोनवद पाटचारीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे कापडणेसह पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात सिंचन विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत पाटचारीची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली. लवकरात लवकर दुरुस्तीचे काम हाती घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अन्यथा व्यापक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला.

# कॉमनवेल्थगेम्सच्या हाईजंपमध्ये भारताला रौप्य पदक

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । प्रतिनिधी:** भारताचे स्टार हाई जंपपटू सर्वेश कुशारे यांनी कॉमनवेल्थ गेम्समध्ये ऐतिहासिक कामगिरी करत देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. पुरुषांच्या हाई जंप (उंची उडी) स्पर्धेत त्यांनी २.२५ मीटर उंच झेप घेत रौप्य पदक पटकावले. कॉमनवेल्थ गेम्सच्या इतिहासात या प्रकारात रौप्य पदक जिंकणारे ते पहिले भारतीय ठरले आहेत. ३१ वर्षीय सर्वेश कुशारे यांनी अंतिम फेरीत सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरी करत पदकावर नाव कोरले.

सुवर्णपदकासाठी त्यांची चुरशीची लढत झाली. मात्र काउंटबॅक नियमामुळे जमैकाच्या रोमेन बेकफोर्ड याला सुवर्णपदक मिळाले, तर सर्वेश यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे भारतीय ॲथलेटिक्समध्ये





आणखी एका ऐतिहासिक पर्वाची नोंद झाली आहे. यापूर्वीही सर्वेश यांनी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली असून, आता कॉमनवेल्थ गेम्समधील रौप्यपदकामुळे त्यांच्या कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा जोडला गेला आहे. सर्वेश कुशारे यांच्या या ऐतिहासिक यशानंतर देशभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भारतीय क्रीडाविश्वासाठी ही कामगिरी अभिमानास्पद मानली जात आहे.

# NEET मध्ये ५७७ गुण

## डॉक्टर बनून समाजसेवेचा संकल्प

जन सम्राट टाईम्स

**उल्हासनगर | प्रतिनिधी :** उल्हासनगरच्या संभाजीनगर परिसरातील गुणवंत विद्यार्थी सत्यजित राजीव खंडारे याने एका वर्षात देशातील तीन प्रतिष्ठित राष्ट्रीय प्रवेश परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्याच्या या यशामुळे संभाजीनगरसह संपूर्ण उल्हासनगर परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी घेण्यात आलेल्या NEET-2026 परीक्षेत सत्यजितने ५७७ गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच अभियांत्रिकी प्रवेशासाठीच्या JEE-2026 परीक्षेत गणिताचा स्वतंत्र अभ्यास नसतानाही ९३.७४ पर्सेंटाईल मिळवून त्याने आपली बौद्धिक क्षमता सिद्ध केली. याशिवाय भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (IISER) प्रवेश परीक्षेत कॅटेगरी रँक ४६७ मिळवत आणखी एक यश आपल्या नावावर नोंदवले. राष्ट्रीय स्तरावरील तिन्ही परीक्षांमध्ये यश मिळवूनही सत्यजितने वैद्यकीय क्षेत्रात करिअर घडविण्याचा निर्णय घेतला असून डॉक्टर बनून समाजसेवा करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्याचा मोठा भाऊ विश्वजित खंडारे हाही वैद्यकीय शिक्षण घेत असल्याने खंडारे कुटुंबाची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध



झाली आहे. सत्यजित हा इंदिराबाई शिवराम खंडारे यांचा नातू तसेच राजीव खंडारे आणि वैशाली राजीव खंडारे यांचा सुपुत्र आहे. तसेच तो उल्हासनगरातील धम्म उपासक आणि सामाजिक कार्यकर्त्या लता एस. पडघाण यांचा भाचा असून, त्यांनीही सत्यजितच्या यशाबद्दल त्याचे विशेष अभिनंदन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. वैद्यकीय शिक्षणासाठी घेण्यात आलेल्या NEET-2026 परीक्षेत सत्यजितने ५७७ गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच अभियांत्रिकी प्रवेशासाठीच्या JEE-2026 परीक्षेत गणिताचा स्वतंत्र अभ्यास नसतानाही ९३.७४ पर्सेंटाईल मिळवून त्याने आपली बौद्धिक क्षमता सिद्ध केली.सत्यजितच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय संस्था, पत्रकार, शिक्षक तसेच नागरिकांकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. मेहनत, जिद्द आणि सातत्य यांच्या बळावर राष्ट्रीय स्तरावरही यश संपादन करता येते, हे सत्यजित खंडारे याने आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे.

# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या याद्या जाहीर

## 'आपले सरकार' पोर्टलचा सर्व्हर डाऊन, e-KYC रखडल्याने शेतकरी त्रस्त

जन सम्राट टाईम्स

**नगर | प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येत आहेत. मात्र, कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली आधार प्रमाणीकरण (e-KYC) प्रक्रिया 'आपले सरकार' पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे रखडली आहे. सर्व्हर सतत डाऊन राहत असल्याने हजारो शेतकऱ्यांना महा-ई-सेवा केंद्रांवर वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून त्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे



लागत आहे. योजनेच्या लाभार्थी याद्या जाहीर झाल्यानंतर मोठ्या संख्येने शेतकरी एकाचवेळी e-KYC करण्यासाठी पोर्टलवर लॉगिन करत असल्याने सर्व्हरवर प्रचंड ताण येत आहे. त्यामुळे पोर्टल वारंवार बंद पडत असून प्रक्रिया पूर्ण होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. अनेक ठिकाणी आधार पडताळणीदरम्यान अंगठ्याचे ठसे (बायोमेट्रिक) जुळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. तसेच पोर्टलवर तांत्रिक त्रुटी येत असल्याने e-KYC प्रक्रिया पूर्ण होत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, बँकेतील थकीत कर्जाची रक्कम, पोर्टलवर दर्शविण्यात आलेली कर्जमाफीची रक्कम आणि e-KYC दरम्यान दिसणारी रक्कम यामध्ये काही ठिकाणी तफावत दिसून येत आहे. त्यामुळे e-KYC प्रक्रिया पूर्ण करावी की नाही, याबाबत शेतकरी संभ्रमात आहेत. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्याशिवाय कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना चालू खरीप हंगामासाठी नवीन पीककर्ज मिळण्यास विलंब होत असल्याची तक्रार आहे.शेतकऱ्यांसाठी सूचना e-KYC करण्यापूर्वी बँकेतील कर्जाची रक्कम आणि पोर्टलवर दर्शविलेली रक्कम काळजीपूर्वक पडताळून पाहावी. रक्कमेत तफावत आढळल्यास e-KYC सबमिट करण्यापूर्वी संबंधित बँक शाखा किंवा तालुका सहकार निबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा.

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

शेतकरी संघटना आणि ग्रामस्थांनी शासनाकडे पुढील मागण्या केल्या आहेत: 'आपले सरकार' पोर्टलची सर्व्हर क्षमता तातडीने वाढवावी. e-KYC पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त मुदत द्यावी. रक्कमेतील तफावत दूर करण्यासाठी तालुका स्तरावर विशेष तक्रार निवारण कक्ष सुरू करावा. तांत्रिक अडचणी दूर करून प्रक्रिया सुरळीत करावी. दरम्यान, प्रशासकीय सूत्रांच्या माहितीनुसार, सहकार विभाग आणि आयटी विभाग पोर्टलची क्षमता वाढविण्याचे काम करत असून e-KYC प्रक्रिया लवकरच सुरळीत होईल, असा दावा करण्यात येत आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306